.

# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर

### माहिती कक्ष, दिनांक १० मार्च २०१९

### सलगर वस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | ५९/२०१९ भादंविसक ४५२,३२४,२९४,३३६,४२७,३४,शस्त्र अधिनियम २५,३४ ,महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | ०८/०३/२०१९ रोजी ०६.०० वा चे सुमारास दोन नंबर झोपडपट्टी शिनगारे दवाखान्याचे जवळ सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | ०९/०३/२०१९ रोजी ०१.५१ am वा |
| फिर्यादी | : | प्रितम राजु जाधव वय-२७ वर्ष व्यवसाय-ड्रायव्हर रा. दोन नंबर,झोपडपट्टी,शिनगारे दवाखान्याचे जवळ, सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | १) श्रीनिवास यल्लप्पा गायकवाड वय-२४ वर्ष रा.से.फ्रि.कॉ.नं.६ सोलापूर<br>२) नागराज यल्लाप्पा गायकवाड वय-२७ वर्ष रा.भैरूवस्ती उद्यविकास,सोलापूर<br>३) अनोळखी १ इसम |
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, वरील नमुद तारखेस वेळी व ठिकाणी, यातील आरोपी मजकुर यांनी फिर्यादीच्या घरी येवुन फिर्यादीच्या बहणीशी भांडण करून लागल्याने फिर्यादी व फिर्यादी यांचे आई-वडील सोडवासोडवी करीत असताना नागराज याचा भाऊ श्रीनिवास हा हातात तलवार व लोखंडी रॉड घेवुन येवुन नागराज याने लोखंडी रॉडने माझ्या पाठीवर व डाव्या मांडीवर मारला तसेच श्रीनिवास यांने तु माझ्या विरूध्द पोलीसांना बातमी दिल्यामुळे मी जेलमध्ये गेलो तसेच अश्लील शिवीगाळ करून तुला बघतोच तु बाहेर ये तुला सोडत नाही,माझ्यावर लय गुन्हे दाखल आहेत माझ कोणी वाकड करू शकत नाही तुला सोडत नाही असे म्हणुन त्याने त्याचे जवळील तलवार फिर्यादीच्या डाव्या हाताच्या मनगटावर मारली व त्यानंतर तीच तलवार श्रीनीवासने उलटी करून पायाचे नडगीवर मारून जखमी करून दहशत निर्माण करून फिर्यादीच्या व शेजारच्या घरावर दगडफेक करून दहशत निर्माण करून फिर्यादीच्या व शेजारचे घरातील सामानाचे ५०००/-रू चे नुकसान केले तसेच सायंकाळी ०६.०० वा चे सुमारास नागराज व श्रीनिवास असे दोघेजण इंडिगो कार घेवुन आले आहेत व एक अनोळखी इसम त्याचे सोबत शाईन कंपनीची मोटार सायकलवर हातात काठी घेवुन येवुन ते सगळे जण आमच्या घरात घुसून नागराज हा हातात लोखंडी गज व दीर श्रीनिवास हा हातात तलवार घेवुन शिवीगाळ करून आमच्या घरावर व वडिलांच्या स्कुटी मोटार सायकलवर दगडफेक करून दोघेजण हातात तलवार व लोखंडी गज दाखवुन |

| | | |
|---|---|---|
| | | दहशत निर्माण करत आहेत.ते दोघे व अनोळखी इसम असे तिघांनी घरातील सामानाची तोडफोड केली आहे म्हणुन तपास:-सपोनि/भुसनुर |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | २८१/२०१९ भादंविसक १७०,३४,३८४,३८६,४१७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ ठिकाण | : | १९/०३/२०१९ रोजी १०.३० वा चे जुना पुना नाका , सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | ०९/०३/२०१९ रोजी १८.२३ वा |
| फिर्यादी | : | प्रशांत पांडुरंग इंगळे वय-४० वर्ष व्यवसाय-नोकरी रा. ३०२,विरायतन रेसीडेन्सी.वसंत विहार,जुना पुना नाका सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | पुत्रप्पा ऊर्फ शिवाजी अंबादास वाघमारे वय-४५ वर्ष रा.२०३ सी-४ सिध्दिविनायक सोसायटी सेक्टर नं.०९ घणसोली,नवी मुंबई |
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, वरील नमुद तारखेस वेळी व ठिकाणी, यात आरोपी इसम नामे पुत्रप्पा ऊर्फ शिवाजी अंबादास वाघमारे वय-४५ वर्ष रा. नांदणी,ता.द.सोलापूर सध्या रा. रा.२०३ सी-४ सिध्दिविनायक सोसायटी सेक्टर नं.०९ घणसोली,नवी मुंबई यांनी पोलीस असल्याची बतावणी करून विनापरवाना वैद्यकीय मशनरी वापरत असलेल्या केसबाबतचे पुरावे तुमच्या विरूध्द कोर्टात दाखल न करण्याच्या मोबदल्यात रोख १०,००,०००/-रू(दहा लाख रूपये) खंडणीची मागणी करून,पैसे न दिल्यास मला अटक करण्याची ,माझ्या पत्नीच्या व मुलाच्या जिवाला धोका करण्याची धमकी देवुन माझ्याकडुन २०००/-रू रोख घेतले आहेत म्हणुन तपास:-पोह/५२८ जाधव |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | २०३/२०१९ भादंविसक ३८० प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ ठिकाण | : | ३१/१२/२०१८ रोजी १२.०० am वा चे १५१,रेल्वे लाईन कनाळे कॉम्पलेक्स,डफरीन चौक, सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | ०९/०३/२०१९ रोजी २०.५१ वा |
| फिर्यादी | : | सतीश पंचप्पा लब्बा वय-४५ वर्ष व्यवसाय-उप कार्यकारी अभियंता रा. १५१,रेल्वे लाईन कनाळे कॉम्पलेक्स,डफरीन चौक, सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | अरसलान सलीम काकन्डीकर वय-१७ वर्ष रा.सोलापूर |
| गेला माल | : | २,००,०००/-रू चार सोन्याच्या बांगड्या प्रत्येकी आडीच तोळे वजनाचे बारीक नक्षीकाम असलेल्या जु.वा.किं.अं. |

| | | |
|---|---|---|
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, वरील नमुद तारखेस वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी यांनी त्याच्या नात्यातील लग्न संमारभ असल्यामुळे फिर्यादीच्या पत्नीने बँकेतील लॉकर मध्ये ठेवलेल सोन्याचे दागिने दि.२८/१२/२०१८ रोजी काढुन घरी आणले होते.सदरचे दागिने लग्नाचा कार्यक्रम झाल्यानंतर घरातील कपाटात ठेवले.त्यानंतर फिर्यादीच्या पत्नीने दि.०८/०३/२०१९ रोजी कपाटील सोन्याच्या दागिने पाहिले असता फिर्यादीस सोन्याच्या **चार** बांगड्या दिसुन आल्या नाहीत त्यामुळे फिर्यादीने मुलगा स्वयम यास बांगड्याबाबत विचारणा केली असता त्याने सांगितले की,माझे बरोबर पंधरा दिवसापूर्वी त्याच्या शाळेतील मित्र अरसलान सलीम काकन्डीकर हा आपले घरी आला होता व तो थोडा वेळ थांबुन संशयास्पद रित्या निघुन गेला होता त्यामुळे अरसलान सलीम काकन्डीकर याने मुद्दाम लबाडीने माझे संमत्ताशिवाय आमचे घरातील ठेवलेले सोन्याचे दागीने चोरून नेलेबाबत माझा संशय आहे म्हणुन तपास:- पोसई/कोकरे |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | २८६/२०१९ भादंविसक ३७९,४२७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ ठिकाण | : | ०९/०३/२०१९ रोजी ०७.०० pm वा चे बँक ऑफ इंडिया.पार्क स्टेडिअम समोरील पार्किग व अँटलान्स समोर सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | ०९/०३/२०१९ रोजी २३.५५ वा |
| फिर्यादी | : | अमित विजयकुमार नय्यर वय-४० वर्ष व्यवसाय-व्यापार रा. आरोश रेसीडेन्सी,रेल्वे लाईन्स सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | अनोळखी १ |
| गेला माल | : | ४०, ०००/-रू किंमतीचा एक एचपी कंपनीचा काळे रंगाचा लॅपटॉप व पिवळ्या रंगाची रेग्झीन बॅग जु.वा.किं.अं. |
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, वरील नमुद तारखेस वेळी व ठिकाणी, यात ०९/०३/२०१९ रोजीचे सायंकाळी ०७.०० वा चे ०७.४५ वा चे दरम्यान बँक ऑफ इंडिया.पार्क स्टेडिअम समोरील पार्किग व अँटलान्स समोरून सोलापूर येथुन कोणीतरी अज्ञात चोरट्याने माझे कारमधुन वर नमुद वर्णनाचा व किंमतीचा लँपटॉप संगणक व डॉ.किर्ती अनिल पांडे यांचे पार्क स्टेडिअम समोर पार्किग केलेल्या कारमधुन ४०००/-रू रक्कम असलेली पर्स,दत्तात्रय गोंविद जाधव यांची अँटलान्स समोर पार्क केलेल्या कारमधुन मो.नं.९९७५५०६५६६६ असलेला मोटो जी कंपनीचा हँडसेट व रक्कम कॅरीबॅग आणि महेश विश्वनाथ दलाल यांची अँटलान्स समोर पार्क केलेल्या कारमधुन मो.नं.९९७०३६६५८३ असलेला सँमसंग कंपनीचा मोबाईल हँडसेट व |

| | | |
|---|---|---|
| | | ७०००/-रू रोख रक्कम असलेली पर्स असा माल चोरून नेला आहे म्हणुन तपासः- पोहेकॉ/६९३ शिंदे |